महापालिका सहाय्यक आयुक्त
भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. ७५२६
दि. ३१/०३/२०२१

विषय :- कोरोना विषाणू (कोव्हीड १९)आजाराच्या अनुषंगाने प्रतिबंधित क्षेत्र सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र घोषित करणेबाबत.

संदर्भ :- १)साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३/०३/२०२०

२)महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.

३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

४)सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र.कोरोना २०२०/५८ आरोग्य ५ दि. १३/०३/२०२०

माहे फेब्रुवारीच्या प्रथम सप्ताहापासून (कोव्हीड १९) च्या रुग्ण वाढीचा दर वाढलेला असून त्यामुळे कोरोना विषाणूचीं दुसरी लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्यस्थितीमध्ये भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयच्या कार्यक्षेत्रातील खालील ठिकाणी (कोव्हीड १९) विषाणूचा संसर्ग वाढत असल्याने रुग्ण आढळून येत आहेत.

| अ.क्र. | क्षेत्रिय कार्यालयाचे नाव | प्रभाग क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नाव |
|---|---|---|---|
| १. | भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय | १८ | राउत वाडा २९ गुरुवार पेठ |
| २. | भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय | १८ | काची आळी गुरुवार पेठ |
| ३. | भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय | १८ | ४२३ गुरुवार पेठ |
| ४. | भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय | १९ | अलका हेरीटेज १२२ भवानी पेठ |
| ५. | भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय | १७ | ४४१ नाना पेठ योगेश्वर सोसायटी |

तरी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी सदरचा परिसर सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेला आहे.

वरील परिसर व त्याच्या आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी खालील सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

सोसायटी/घर/बंगला तसेच चाळ ई.ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांनी खालील घरी भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे पल्स ऑक्सिमीटर आणि थर्मल डिटेक्टरच्या सहाय्याने तपासणी केली जावी. कोव्हीडसाठी प्लस ऑक्सिमीटर तपासणी ही दिशादर्शक आहे. ज्या व्यक्तीची ओ-२ सॅच्युरेशन लेव्हल ही ९४ च्या खाली असल्यास त्यास त्वरित

पुढील तपासणी करिता महापालिकेची रुग्णालये अथवा खाजगी डॉक्टर यांचेमार्फत तपासणी करून घेणेबाबतची सूचना देण्यात यावी.

सोसायटी/घर/बंगला या ठिकाणी राहणाऱ्या जेष्ठ व्यक्ती/१० वर्षाखालील मुले/आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्ती यांची पल्स ओक्सिमीटर द्वारे तपासणी करून दैनदिन नोंद ठेवण्यात यावी.

या अनुषंगाने ज्या व्यक्तींची ०/२ सॅच्युरेशन लेव्हलही ९४ किंवा त्या खाली आल्यास अशा व्यक्तीची डॉक्टरच्या सल्ल्याने तात्काळ स्वब टेस्ट करून घेण्यात यावी,स्वब टेस्ट करणेकरिता भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयमार्फत क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे महानगरपालिका शाळा या ठिकाणी मोफत सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास आपण आपले परिसरातील आरोग्य निरीक्षक यांचेशी संपर्क साधावा.

आपले सोसायटी/घर/बंगला ई. ठिकाणी कोव्हेद १९ व्यतिरिक्त इतर आजारांकारिता रुग्णालयात दाखल असणाऱ्या रुग्णांबाबतची महती कृपया bhavanipeth@punecorporation.org या इमेल वर उपलब्ध करून द्यावी. जेनेकारुन केवळ कोव्हेद १९ चे अनुषंगाणे माहितीचे विश्लेषण करून वैद्यकीय विभागामार्फत पुढील मदत उपलब्ध करून देता येईल.

सोसायटीचे आवारात सोशल डीस्टन्सिंग चे पालन केले जाईल व प्रत्येक व्यक्ती मास्कचा वापर याबाबतची दक्षता घ्यावी.

वरील सूचनांचे पालन करून आपण आपली व आपल्या कुटुबांची तसेच आपल्या परीसराचा कोव्हीड १९ पासून बचाव करू शकता.

पुणे शहर कोरोना विषाणू मुक्त करणेकरिता आत्तापर्यंत आपण दिलेल्या सहकार्याबद्दल भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचे वतीने मी आपला ऋणी असून अदयापही कोरोनाचे संकट पूर्णतः न टळल्याने आपण सहकार्य करावे ही विनंती

01/03/2021

सचिन तामखडे
महापालिका सहाय्यक आयुक्त
भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी :-

१) मा.सहाय्यक आरोग्य प्रमुख पुणे महानगरपालिका
२) मा.उप आयुक्त परिमंडळ क्र.५ पुणे महानगरपालिका
३) समन्वयक, डीपीसी सेल पुणे महानगरपालिका
४) मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन ,पुणे
५) मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन ,पुणे
६) मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक समर्थ पोलीस स्टेशन ,पुणे